# सपाटेंचे नवे प्रकरण एक : मात्र तक्रारींच्या बाराभानगडी अनेक!

# बडतर्फ नेत्याकडं राजकीय कार्ड ए, 'मनोहर' पंतांचा विषय लय हार्ड ए !!,

दरम्यान, सपाटे यांच्यावर कारवाई करतानाच संबंधित पिडित महिलेस न्याय मिळवून देण्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना वरिष्ठामार्फत सोलापूरच्या पोलिस यंत्रणेला मिळत आहेत. पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्यासमोर सपाटे प्रकरणाची फाईल असल्याचे सांगण्यात आले.

✔ सोलापूर/ खास प्रतिनिधी

माजी महापौर तथा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बडतर्फ नेते मनोहर सपाटे यांच्यावर ३५ वर्षीय महिलेने विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. शिवाय सपाटे यांची मालकी असलेल्या सोलापुरातील शिवपार्वती लॉजमध्ये घडलेल्या तथाकथित प्रकरणाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. तद्नंतर याप्रकरणाचे अनेक कंगोरे समोर येत आहेत. या प्रकरणाच्या अनुषंगिक, अनेक व्हिडीओ आणि फोटोज् सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. शिवाय सपाटेंच्याबाबतीत एक नवे प्रकरण आहे, मात्र तक्रारींच्या अनेक बाराभानगडी समोर येत आहेत. 'सपाटेंच्याकडे राजकीय कार्ड ए...'मनोहर' पंतांचा विषय लय हार्ड ए!! अशी चर्चा सर्वत्र रंगत आहे.



### ॲड. पवारांना उडविण्याचा सपाटेंचा गंभीर व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल, पंतांचा पाय आणखी खोलात

मनोहर सपाटे यांना विनयभंगाचे प्रकरण अत्यंत जड जात आहे. अशात त्यांनी संबंधित पिडित महिलेस न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या ॲड. योगेश पवार यांना बिहारीकडून स्टेनगनने उडविण्याचे वक्तव्य करणारा सपाटेंचा अत्यंत गंभीर व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. 'माझ्याकडे आत्ताच बिहारी लोक येऊन गेले, स्टेनगन घेऊन आले होते, ॲड. पवार याला उडविल्याप्रकरणात आम्ही कोणाचे नावदेखील घेणार नाही' असे म्हणत होते, मारण्याबद्दल मला काल फोनदेखील आला होता, मारणारे महाराष्ट्रातीलसुद्धा आहेत, कोणीही मारेल, अशा आशयाचा संवाद व्हायरल व्हिडीओमध्ये आहे. ॲड. पवार यास आमच्या घरचेसुध्दा मारतील. माझ्याकडे काय पुतणे कमी आहेत का? असेदेखील सपाटे म्हणाल्याचे व्हायरल व्हिडीओमधून दिसते.

### डॉ.फडकुले सभागृहात आज सायंकाळी बैठक; मराठे एकवटणार, सपाटेंच्या कारनाम्यांवर धोरण ठरणार

मनोहर सपाटे यांची विकृती त्या अनुषंगिक, छत्रपती शिवाजी प्रशालेची बदनामी थांबविण्याबद्दल सोलापुरातील सर्व मराठा समाज बांधव, शिवप्रेमी तसेच छत्रपती शिवाजी प्रशालेचे माजी विद्यार्थी या सर्व संबधितांची आज मंगळवार सायंकाळी पाच वाजता येथील डॉ. फडकुले सभागृहात बैठक बोलावण्यात आली आहे. दिलीप कोल्हे, नाना काळे, पुरुषोत्तम बरडे, सुनील रसाळे, अमोल शिंदे, शेखर फंड, विनोद भोसले, श्रीकांत घाडगे, तुकाराम मस्के आदीजण या बैठकीस उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.





**तक्रार : १**

### राज्य महिला आयोगाचे पोलिस आयुक्तांना आदेश

मनोहर सपाटेंच्या अश्लिल कृत्य अन् हावाभावासंबंधी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पोस्ट अन् दाखल विनयभंगाचा गुन्हा...समाजामध्ये नापसंतीचा उमटलेला सूर या पार्श्वभूमीवर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याकडे सोलापुरातून तक्रारी करण्यात आल्यानंतर त्यांनी याप्रकरणाची दखल घेतली असून यासंबंधीचा अहवाल पाठवण्याचे आदेश पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांना दिले आहेत. पिडितेचे म्हणणे ऐकून घेऊन तिला न्याय देण्याचेही आदेश दिले आहेत.



- कारवाईसंबंधी पोलिस यंत्रणेला वरिष्ठ पातळीवरुन सूचना
- पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्यासमोर सपाटे प्रकरणाची फाईल
- पडद्याआड अन् पडद्यामागे अनेक षडयंत्र

**तक्रार : २**

### सपाटेंकडून माझ्यासह कुटुंबिय अन् ॲड. पवारांच्या जीवाला धोका

मनोहर सपाटेंची विकृती सोशल मीडियावरुन समाजापुढे आणल्याबद्दल वैयक्तिक राग, सूड आणि राजकीय दबावाने माझ्यासह ॲड. योगेश पवार यांच्यावर माहिती तंत्रज्ञान अधिनियम, अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व खंडणीसारखे खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न सुरु आहे, यामुळे माझ्या व ॲड. योगेश पवार यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. माझ्या कुटुंबालाही धोका पोचण्याची भिती असल्याची तक्रार संबंधित पिडित महिलेने अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय यांच्या नावे दिली आहे.

**तक्रार : ३**

### आक्षेपार्ह व्हिडीओप्रकरणी सपाटेंकडून 'वायपीं'विरुद्ध तक्रार

आक्षेपार्ह व्हिडीओ फेसबुकवरुन व्हायरल करुन बदनामी केल्याप्रकरणी पीडित महिलेच्या प्रकरणातील ॲड. योगेश पवार यांच्याविरुद्ध आयटी ॲक्ट कलम ६७(अ) प्रमाणे फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तक्रार : ४**

### चित्रा वाघ, अंजली दमानियांचे पोलिस आयुक्तांना फोन

सपाटेंच्या विकृतीसंबंधी आणि पिडितेवर झालेल्या अन्यायासंबंधी सोमवारी चित्रा वाघ आणि अंजली दमानिया यांच्याकडे तक्रारी दाखल झाल्यावर त्यांनी तातडीने पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क करुन हे प्रकरण गांभीर्याने घेऊन पिडितेस न्याय देण्याबद्दल पोलिस आयुक्तांना सूचित केले.

**तक्रार : ५**

### सुहास कदमांचे कारनामे प्रदेशाध्यक्ष चव्हाणांच्या कानावर

अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुहास कदम यांनी पिडित महिलेच्या विरुद्ध जाऊन मनोहर सपाटे यांची भेट घेऊन त्यांना सहकार्य करण्याचा शब्द दिला. तसेच 'सदैव सोबत' असा स्लोगन लिहिलेला सपाटे यांच्यासोबतचा फोटो काही जणांना व्हायरल केला. दरम्यान आक्षेपार्ह फोटोसह युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्याकडे सोमवारी तक्रारी करण्यात आल्या. पिडितेस न्याय मिळवून देण्याऐवजी, विकृत सपाटेंच्या समर्थनामधील कदम यांची भूमिका चुकीची असून त्याबद्दल त्यांना समज देण्यात यावी, असे तक्रारीवेळी सांगितले. शिवाय सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार हेदेखील सपाटे यांच्या समर्थनार्थ उभे राहिल्याचा मेसेज, सपाटे यांच्यासोबतची प्रत्यक्ष चर्चा आणि फोटो व्हायरल होत असल्याने समाजात त्यांच्याबद्दलदेखील रोष निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे.

**तक्रार : ६**

### मराठा क्रांती मोर्चाचे नेते भेटणार पोलिस आयुक्तांना



ॲड. योगेश पवार यांनी संबंधित पिडितेस न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यावरुन त्यांना जीवेमारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, बघून घेण्याची भाषा त्यांच्याबद्दल केली जात आहे, त्यातून ॲड. पवार यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे लक्षात घेता, मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने पोलिस आयुक्तांकडे तक्रार केली जाणाएर असल्याचे शिंदे शिवसेना गटाचे नेते दिलीप कोल्हे यांनी सांगितले. पिडितेस न्याय मिळवून देण्यासाठी ॲड. पवार यांनी भूमिका घेतली ती चुकीचा का? असा सवाल कोल्हेंनी उपस्थित करुन सपाटेंवर कारवाई व्हायलाच हवी, असे सांगितले.

## चरणसेवेच्या उपक्रमावर वारकरी खुश भाविकांनी मानले शासनाचे आभार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात धर्मपुरी येथे फूट मसाजच्या चरणसेवेचा शुभारंभ ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर उभारण्यात आलेल्या चरणसेवा केंद्रातील वारकरी बांधव यांच्याशी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संवाद साधला. स्वयंचलित फूट मसाजमुळे चालून चालून थकलेल्या पायांना आराम मिळत असल्याने या सेवेवर वारकरी जाम खुश आहेत.

जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांनी सर्वाधिक फूट मसाजवर वारकऱ्यांसाठी वेळेत उपलब्ध करून दिले आहेत. धर्मपुरी, कारूंडे बंगला, शिंगणापूर फाटा, तसेच सर्व मुख्यमंत्री सहाय्यता निवारा कक्षात हे फूट मसाजर बसविणेत आले आहेत. या सर्व केंद्राचा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी भेट देऊन वारकरी यांच्याशी संवाद साधला. सीईओ कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील त्यांच्या टीमने लक्ष घालून कमी कालावधीत फूट मसाजर उपलब्ध करून दिले आहेत. प्रशिक्षणासह १५० पेक्षा अधिक कर्मचारी या चरणसेवेसाठी तैनात करण्यात आले आहेत.

**चरणेसेवेसाठी रांगा**

आळंदी ते धर्मपुरी १४० किमीचा पायी प्रवास करून थकलेले पाय मशीनद्वारे दाबून घेण्यासाठी रांगा लागल्या आहेत. महिलांसाठी स्वतंत्र कक्ष करण्यात आलेला आहे. वृध्द भाविकांची चरण सेवेसाठी झुंबड उडाली आहे. विशेषता महिला भाविकांची संख्या अधिक आहे. बंदोबस्तासाठी आलेले पोलिस कर्मचारी व अधिकारीदेखील या चरणसेवेचा लाभ घेत आहेत. या चरणसेवेसाठी कक्ष अधिकारी अविनाश गोडसे व कक्ष अधिकारी झेड. ए. शेख यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

## विविध ठिकाणी दोघांचा झोपेत मृत्यू

✔ **सोलापूर** : सोलापूर -शहर परिसरात विविध ठिकाणी झोपेत असताना दोघांचा मृत्यू झाल्याची नोंद शहर पोलीसात झाली आहे.पहिली घटना सैफुल परिसरातील गुरुदेवनगर येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. संतोष रामचंद्र माडे (वय ५७ रा.लष्कर. सध्या राहणार गुरुदेवनगर (भाग५) सैफुल असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास ते घरात झोपले होते. नातेवाईकांनी त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला असता ते बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांना किशोर (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली. दुसरी घटना बाळे परिसरातील श्रद्धा रेसिडेन्सी येथे सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. महेश उद्धवराव तांबे (वय ४४ रा. येवती ता.तुळजापूर सध्या रा.बाळे सोलापूर) असे मयताचे नाव आहे.ते सोमवारी सकाळी सात वाजेच्या सुमारात घरात झोपले होते. त्यांना देखील उठवण्याचा प्रयत्न केले असता ते बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांना नातेवाईकांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले.या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे. यामागचे निश्चित कारण समजले नाही.

## वारकरी कुटुंबाशी 'कनेक्ट' राहण्यासाठी 'चार्जिंग'ची सोय

✔ सोलापूर/प्रतिनिधी

मानाच्या पालख्यांबरोबर पायी चालत येणाऱ्या वारकऱ्यांना आपल्या कुटुंबाची ख्यालीखुशाली विचारण्यासाठी व्यत्यय येऊ नये म्हणून मोबाईलला चार्जिंग करता यावे म्हणून पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून 'पंढरीच्या दारी वारकरी मोबाईल चार्जिंग करी' यासाठी ५ ऊर्जा वाहनाची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

संतांच्या पालख्यांबरोबर अनेक वारकरी दुरून काही चालत येत असतात बरेच दिवस ते कुटुंबापासून दूर असतात. दिवसभर चालून थकल्यावर संध्याकाळी मुक्कामाच्या ठिकाणी निवाऱ्याला आल्यावर कुटुंबांशी त्यांचा संपर्क सुरू असतो. अशात मोबाईलला चार्जिंगची व्यवस्था न झाल्यास त्यांचा संपर्क तुटतो. वारकऱ्यांना ही समस्या भेडसावून नये म्हणून जिल्हा परिषद प्रशासनातर्फे पालखी मार्गावर ५ ऊर्जा वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. या वाहनावर एकाच वेळी १०० मोबाईल चार्जिंग करता येणार आहेत. तसेच या वाहनावर असलेल्या डिस्प्लेद्वारे शासनाच्या विविध योजनांचा प्रचार करण्यात येणार आहे. ऊर्जा वाहन पालखी सोहळ्याबरोबर पुढे सरकणार आहेत. विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी या वाहनांचे अविरत सेवा राहणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

ग्रामपंचायत विभागावर अनेक जबाबदाऱ्या देण्यात आलेल्या आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी व कर्मचारी पालखी महामार्गावरील सर्व सुविधा अंमलात आणण्यासाठी कार्यरत राहणार आहेत. पालखी मार्गावर वळणाच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. या फलकावर पालखी तळ, हिरकणी कक्ष, पिण्याचे पाणी, गावचा नकाशा, वारकरी सुविधा केंद्र, आरोग्य केंद्र, कचरा संकलन, शौचालय व स्नानगृहाची माहिती देण्यात आली आहे.




### वारकऱ्यांसाठी सोयीसुविधा

पालखी सोहळ्याबरोबरचे वारकरी व दिंडीप्रमुखांना कचरा संकलित करण्यासाठी प्लास्टिक पिशव्या देण्यात येणार आहेत. याद्वारे कचरा संकलित करण्यात येणार आहे. तसेच ठिकठिकाणी कचराकुंड्या उभारण्यात येणार असून ग्रामपंचायतीच्या घंट्यागाड्यामार्फत ग्रीन शेडमध्ये हा कचरा संकलित करून विल्हेवाट लावले जाणार आहे. वारकऱ्यांच्या सुविधेसाठी राबणारे कर्मचारी व स्वयंसेवकांना पावसापासून संरक्षण मिळवण्यासाठी रेनकोट देण्यात येणार आहेत. तीन पाळीमध्ये हे कर्मचारी काम करणार आहेत.

## विठ्ठल दर्शनाची आस अधुरीच राहिली; वारीतच २ वारकऱ्यांवर काळाचा घाला

✔ नातेपुते/प्रतिनिधी



संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील नागपूरच्या दोन वारकऱ्यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना दि. २९ जूनला दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास फलटण तालुक्यातील बरडजवळ घडली. तुषार रामेश्वर बावनकुळे (वय २२, रा. खलासना, नागपूर) व मधुकरराव तुकाराम शेंडे (५५, रा. मेडिकल चौक, नागपूर) अशी त्या मृत झालेल्या वारकऱ्यांची नावे आहेत.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा रविवारचा मुक्काम बरड (ता. फलटण) येथे होता. बरड जवळील टोलनाका येथे मुक्कामासाठी टेंट उभारताना तुषारने लोखंडी रॉडला हात लावल्यानंतर त्यांना शॉक बसला. तुषार रॉडला चिटकल्याने त्यांना बाजूला काढण्यासाठी पुढे आलेले मधुकरराव हेही तुषार यांना चिटकले तेव्हा दोघांना विजेचा शॉक बसला. त्यावेळी तत्काळ १०८ ॲम्ब्युलन्सला कॉल केला. दोघांनाही उपचारासाठी दुपारी ४.५० वाजण्याच्या सुमारास नातेपुते येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. नम्रता व्होरा यांनी दोघेही उपचारापूर्वी मृत झाल्याचे घोषित केले.

### विठ्ठलाच्या दर्शनाची आस अधुरीच राहिली

मधुकर तुकारामजी शेंडे (५६, राजाबक्षा, नागपूर) व तुषार रामेश्वर बावनकुळे (२२) दोघेही निस्सीम विठ्ठलभक्त होते. शेंडे हे नेहमीप्रमाणे यंदादेखील ते उत्साहाने वारीत सहभागी झाले. बरडजवळ पालखीचा मुक्काम होता. शेंडे व बावनकुळे इतर वारकऱ्यांसह तंबूत विश्रांतीसाठी थांबले होते. कपडे वाळत टाकण्यासाठी दोरी बांधत असताना बाजूलाच असलेल्या विजेच्या खांबातून त्यांना जोरात शॉक लागला. दोघेही बेशुद्ध पडले. या घटनेमुळे त्यांच्या सहकारी वारकऱ्यांमध्ये शोककळा पसरली होती. शेंडे हे अविवाहित होते व त्यांनी संपूर्ण जीवन वारकरी सेवा व समाजसेवेला अर्पण केले होते. ते बावणे कुणबी समाज केंद्रीय संस्थेचे सक्रिय सदस्य होते. विविध सामाजिक संघटनांशी ते जुळले होते.